## रे.क.न. ७४/२०२० मधील निशाणी क्रमांक ५ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा दावा कायम मनाईसाठी दाखल केला आहे.

०२. दावा मिळकत प्रतिवादीनी स्वतः अगर इतरामार्फत वादींचे दावा मिळकतीचे कायदेशीर हक्काचे कब्जा वहिवाटीस अडथळा अगर हरकत करु नये म्हणून त्यांचे विरुध्द दावेचे अंतिम निकालपावेतो तुर्तातुर्त मनाई आदेश पारित व्हावा अशी विनंती उक्त अर्जान्वये केली आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन** –

०३. मौजे वाघुर्डे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील शेतमिळकती–

| अ. क्रं. | गट नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे | पैकी क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | १२५–अ | ११.४० | ०१–९६ | पूर्ण |
| २. | १२५–ब | ००.११ | ०१–६७ | पूर्ण |
| ३. | १२५–क | ०.७.२० | ००–६९ | पूर्ण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | ४९५ | ०.८.०० | ००–१० | १/२ पश्चिम बाजू |

वर नमुद मिळकत ही या दाव्याचा वाद विषय होय.

(यापुढे सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.)

## अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

**०४.** प्रतिवादी क्रं.१ हे वादीचे सख्खे भाऊ असून प्रतिवादी क्रं. २ व ३ ही त्यांची मुले आहेत. वादी यांनी पन्हाळा न्यायालयात रे.क.नं.१०९/१९९० चा दावा सरस निरस मानाने वाटपासाठी दाखल केला होता व त्याचा दि.१६.०८.२०१० रोजी निर्णय होऊन वादी व प्रतिवादीचे हिस्सेचे वाटप होऊन तुटकपणे कब्जा देणेचा हुकुम झाला. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे वाटपासाठी पाठविणेत आले होते. त्याप्रमाणे त्यांनी प्राधिकृत अधिकारी तहसिलदार, पन्हाळा यांचेकडे प्रकरण वाटपासाठी पाठवले व तहसिलदार पन्हा यांनी मोजणीसाठी व हिस्सेप्रमाणे वाटपासाठी प्रकरण तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, पन्हाळा यांचकडे पाठवले. त्याप्रमाणे त्यांनी मोजणी करुन वाटप तक्ता तयार केला व त्याप्रमाणे नविन नकाशे तहसिलदार पन्हाळा यांचेकडे पाठविले. त्यानंतर दोन्ही पार्टीच्या हरकती घेऊन तहसिलदार पन्हाळा यांनी वाटप तक्ता दि.

१२.०१.२०१८ रोजी कायम केला.

**०५.** त्यानंतर प्रतिवादी क्रं. १ यांनी नाराज होऊन अपिल दाखल केले ते अपिल नामंजूर झाले. त्यानंतर मंडळ अधिकारी भाग कळे यांना कब्जा देणेसाठी प्राधिकृत करुन कळविले. त्यावेळी वाटप तक्त्याप्रमाणे जमिनीची मोजणी करुन व खुणा करुन हद्दी निश्चित करुन त्याप्रमाणे वादीना जमिनीचा प्रत्यक्ष कब्जा देणेत आला व त्याप्रमाणे पंचासमक्ष व अधिकारी यांचे समक्ष कब्जा घेतलेबाबत व वादी व प्रतिवादीना कब्जा दिलेबद्दल कब्जेपट्टी करणेत आली. त्याप्रमाणे वादीनी कब्जा मिळालेबाबत पोहोच पावती लिहून दिली व प्रत्यक्ष कब्जा ०४.०७.२०१९ रोजी घेतला असून आज अखेर त्यांची प्रत्यक्ष कब्जा व वहिवाट वाटपानुसार आलेल्या जमिनीत सुरु आहे. त्यानंतर वाटप तक्त्याप्रमाणे व कब्जेपट्टी प्रमाणे ७/१२ उतारे फेरफार क्रं. १७५४ नुसार करणेत आले व नकाशेही तयार करणेत आले. ज्याच्या त्याच्या मालकी हक्काने नोंदी करणेत आल्या. दावा मिळकत १ ते ३ या पूर्णपणे वादी नं. १ चे ताबेत असून दावा मिळकत क्रं.४ या पश्चिमेकडील १/२ भाग वादी नं. १ ला देणेत आला आहे.

**०६.** वादीना वाटपाप्रमाणे आले मिळकतीमध्ये वादी ऊस, भात,

गवत, नाचणी अशी पिके आहेत. भात नाचणी काढले असून बाकी पिके अद्याप काढणेची आहेत. वादी हे दि. २२.११.२०२० रोजी जमिनीत कष्ट मशागतीसाठी गेले असता प्रतिवादी हे एक जमावाने आले व काठया घेऊन वादीचे अंगावर धाऊन आले व तुम्हाला येथे आता कष्ट मशागत करु देणार नाही व पुढे याल तर ठार मारीन व जमिनीत पुरुण टाकू अशी धमकी दिली. त्यामुळे वादीचे जिवीतास धोका निर्माण झालेने वादींना नाईलाजाणे प्रतिवादी स्वतः अगर इतरामार्फत वादींचे दावा मिळकतीचे कायदेशीर हक्काचे कब्जा व वहिवाटीस स्वतः अगर इतरामार्फत अडथळा अगर हरकत करुन नये म्हणून त्यांचे विरुध्द कायम मनाई हुकूम होणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०७. प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्रं.१७ वर दाखल केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खोटा व लबाडीचा असून तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. मनाई अर्ज कलम १ मध्ये वादीने दावा मिळकतीचे जे वर्णन केले आहे ते चुकीचे, अपूरे असून गट क्रं. ४९५ पैकी १/२ हिस्सेचे चतुःसिमा नमुद केले नसलेने दावा मिळकतीचा बोध होत नाही त्यामुळे सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही.

०८. प्रतिवादी क्रं. १ यांनी गट नं. १२५–अ,ब, व क या जमिनी

मध्ये बंडीग सपाटीकरण करुन बरीचशी रक्कम खर्च करुन जमीनीची प्रत सुधारली आहे व सदर जमीनीमध्ये प्रतिवादी क्रं. १ हे सालोसाल ऊस,भात अशी पिके घेत आले असून सदर जमीनीमधील ऊस पिकासाठी पाण्याची सोय व्हावी म्हणून पाईप लाईन टाकलेली आहे. वाटप केस नं. २२/१४ मध्ये सदरचे संपूर्ण जमीनी वादीचे वाटपास सुचविले आहेत. सदर वाटपाबाबत प्रतिवादी क्रं. १ ने अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर याचे कोर्टानी निर्णया विरुध्द अपील क्रं. २४/२०१९ दाखल केले असून सदरचे अपील निर्णयावर आहे. सदर अपीलाकामी तहसीलदार पन्हाळा व एस.डी.ओ. पन्हाळा यांचा निर्णय रद्द होईल म्हणून वादीने खोटा अर्ज दाखल केला आहे.

**०९.** दावा जमीनीमध्ये प्रत्यक्षपणे प्रतिवादी क्रं. १ ची मालकी वहिवाट होती व आहे. सदर जमीनीचा प्रत्यक्षपणे कब्जा प्रतिवादी क्रं. १ कडून केंव्हाही काढून घेऊन वादीस दिलेला नव्हता व नाही. वादी हे केंव्हाही कब्जा घेणेस आलेले नव्हते व नाही. वादी यांनी दाव्यात दाखल केले कागद हे पोकळ, बनावट असे आहेत. दि.०४.०७.२०१९ रोजी कब्जा देव घेव करणेबाबत मंडळ अधिकारी कळे यांनी प्रतिवादी क्रं. १ अथवा प्रतिवादी क्रं. २ व ३ यांना कोणत्याही प्रकारे पूर्व नोटीस काढलेली नव्हती व नाही. तसेच दि. ०४.०७.२०१९ चे तथाकथित पंचनामा, ताबा पावती वर प्रतिवादींच्या सहया

नाहीत. सदर पंचनामा, ताबा पावती पूर्व प्रतिवादींना कोणत्याही प्रकारे नोटीस नव्हती व नाही. त्यामुळे तथाकथित पंचनामा, कब्जेपट्टीचे अस्तीत्व अंमलबजावणी प्रतिवादी यांना मान्य नाही.

**१०.** दावा जमीनी गट नं. १२५–अ, ब, व क या जमीनीमधून प्रतिवादी यांनी सालोसाल ऊस, भात अशी पिके घेतली होती. रे.क.नं.१०९/१९९० मधील वादीचा नि.५ अर्ज नामंजूर झाला होता. वादी हा वाघुर्डे गावी कधीही येत नाही. वादी हा कायमपणे कोल्हापूर येथे रहावयास आहे. सन २०१९–२०२० साली गट नं. १२५–अ, ब, क या जमीनीमध्ये प्रतिवादींनी ऊसाचे खोडवे पिक केले आहे. सदर पिकासाठी वादीने हनुमान सह. पाणी पुरवठा संस्थेचे पाणी घेतले आहे. सदर जमीनीतील ऊसाचे खोडवे प्रतिवादींनी कुंभी कासारी सह.साखर कारखाना लि. कुडित्रे या कारखनेस डिसेंबर २०२० रोजी प्रतिवादी नं. ३ चे नावे विक्रीस पाठविला असून सदर बिल प्रतिवादी क्रं. ३ ला आदा झाले आहे. सदर जमीनीचे ७/१२ पत्रकी बापू कृष्णा पाटील यांचे नाव नमुद असलेने सदर जमिनीतील ऊसाचा शिक्षणकर बापू कृष्णा पाटील यांचे नावावर प्रतिवादीनी भरला आहे. तसेच जमीनीमधील निडवे ऊस पिकाची नोंद प्रतिवादी क्रं. ३ चे नावावर कुंभी कासारी सह. कारखानेस डिसेंबर २०२१ रोजी केली आहे.

**११.** गट नं. १२५-अ, १२५-ब व १२५-क या जमीनीमध्ये वादीची केंव्हाही वहिवाट नव्हती व नाही. सदर जमीनीत प्रत्यक्षपणे प्रतिवादी क्रं.१ची वहिवाट होती. प्रतिवादी क्रं. १ हे गेले चार वर्षापासून अर्धांगवायुचे विकाराने आजारी असलेने गेले चार वर्षापासून सदर जमीनीत प्रत्यक्षपणे प्रतिवादी क्रं. २ व ३ यांची वहिवाट आहे. सदर जमीनीमध्ये वादीची प्रत्यक्ष वहिवाट नसलेने सदर जमीनीमधील ऊस पिकाबाबत वादीने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. प्रतिवादी यांनी वादी यांचे मनाई अर्जातील संपूर्ण मजकूर अमान्य केला आहे.

**१२.** वादीनी दावा जमिनीमधील प्रतिवादींचे प्रत्यक्ष वहिवाटीबाबत महत्वाची वस्तुस्थिती तसेच अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे कोर्टातील वाटप अपील नं. २४/२०१९ चे प्रलंबित असलेची महत्वाची वस्तुस्थिती मे. कोर्टापासून लपवून ठेवली असलेने वादीस तुर्तातुर्त मनाई सारखी दाद मागता येणार नाही.

**१३.** वादीच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे कथन तसेच संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूचे निष्कर्ष कारणमिमांसेह

खालील प्रमाणे –

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | होकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे ? | होकारार्थी |
| ३. | उक्त अर्ज नामंजूर केल्यास वादी चे अपरिमित नुकसान होईल ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

**१४.** वादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ३ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | मौजे वाघुर्डे येथील बंडा बापू पाअील यांचे नांवचा ८–अ चा खाते क्रं. ९३० चा उतारा | ०२.११.२०२० | स.शि.नक्कल |
| २. | मौजे वाघुर्डे येथील भू गट क्रं. १२५–अ चा सातबारा उतारा | ०२.११.२०२० | स.शि.नक्कल |
| ३. | मौजे वाघुर्डे येथील भू गट क्रं. १२५–ब चा सातबारा उतारा | ०२.११.२०२० | स.शि.नक्कल |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | मौजे वाघुर्डे येथील भू गट क्रं. १२५–क चा सातबारा उतारा | ०२.११.२०२० | स.शि.नक्कल |
| ५. | मौजे वाघुर्डे येथील भू गट क्रं. ४९५ चा सातबारा उतारा | ०२.११.२०२० | स.शि.नक्कल |
| ६. | मौ. वाघुर्डे, ता.पन्हाळा येथील आनुबाई शामराव पाटील यांचे नावचा ८–अ चा खाते क्रं. ९३२ चा उतारा. | ०२.११.२०२० | स.शि.नक्कल |
| ७. | मौ.वाघुर्डे, ता.पन्हाळा येथील गट नं. २३५ चा सातबारा उतारा. | ०२.११.२०२० | स.शि.नक्कल |
| ८. | मौ.वाघुर्डे, ता.पन्हाळा येथील फेरफार नं. १७५४ चा उतारा. | ०२.११.२०२० | स.शि.नक्कल |
| ९. | मे. सि.ज.ज्यु.डी पन्हाळा येथील रे.क.नं.१०९/१९९० चा हुकुमनामा. | ०७.१०.२०१३ | झेरॉक्स |
| १०. | तहसीलदार पन्हाळा यांचेकडील क्र.कोर्ट वाटप/ वाटप/ एस.आर./२२/२०१४ ची निकाली नोटीस. | १२.०१.२०१८ | झेरॉक्स |
| ११. | उपिविभागीय अधिकारी पन्हाळा यांचे कडील क्र.आर.टी.एस. अपिल नं.३३/२०१८ ची | १७.०१.२०२० | स.शि.नक्कल |

| | | | |
|---|---|---|---|
| | निकाली नोटीस. | | |
| १२. | सर्कल ऑफीसर भाग कळे यांनी केलेला कब्जे पट्टी पंचनामा | १७.०१.२०२० | स.शि.नक्कल |
| १३. | ताबा पावती वादी प्रतिवादीची | १७.०१.२०२० | स.शि.नक्कल |
| १४. | ताबा पावती वादी नं.१ ने ताबा घेतलेची. | १७.०१.२०२० | स.शि.नक्कल |
| १५. | ताबा पावती वादी नं.२ ने ताबा घेतलेची. | १७.०१.२०२० | स.शि.नक्कल |

**१५.** प्रतिवादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ३५ व ३७ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| **अ.क्रं.** | **कागदाचा तपशील** | **दिनांक** | **दाखल कागद** |
|---|---|---|---|
| १. | दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्रं. १ ने केलेल्या ऊसनोंदणी च्या पावत्या (एकूण ५) | – | अस्सल |
| २. | अतिरिक्त विभागीय आयुक्त पुणे यांचे समोर क्र./आर.टी.एस./रि./को/४०/२०२१ दि.०१.०९.२०२२ | – | झेरॉक्स |
| ३. | दावा मिळकतीच्या ऊस नोंदणीच्या पावत्या (एकूण १२ पावत्या) | – | झेरॉक्स |

## का र ण मि मां सा

**१६.** दावा मिळकतीत वादीची कब्जे वहिवाट आहे हे वादी प्रथमदर्शनी शाबित करतात का हे पाहाणे गरजेचे आहे. वादीव प्रतिवादी यांना त्यांच्या दोघांमध्ये दावा मिळकती संदर्भाने वाटपाचा दावा रे.क.नं.१०९/१९९० हा दाखल होता व तो निकाली दि. १६.०८.२०१० रोजी झाला आहे. ज्यामध्ये वादी व प्रतिवादींचे हिस्से वाटप न्यायालयाने ठरवले आहे या बाबी मान्य आहेत.

## प्रश्नबिंदू क्रं.१ करीता–

**१७.** दावा मिळकतीत वादीची कब्जे वहिवाट आहे हे वादी प्रथमदर्शनी शाबित करतात का हे पाहाणे गरजेचे आहे. वादी व प्रतिवादी यांना त्यांच्या दोघांमध्ये दावा मिळकती संदर्भाने वाटपाचा दावा क्रं.१०९/१९९० हा दाखल होता व तो निकाली दि. १६.०८.२०१० रोजी झाला आहे. ज्या मध्ये वादी व प्रतिवादींचे हिस्से वाटप न्यायालयाने ठरवले आहे याबाबी मान्य आहेत.

**१८.** वादीने त्या न्यायनिर्णयाची प्रत नि.३/९ ला दाखल केली आहे. तसेच सदर न्यायालयाच्या हुकुमानुसार महसुल खाती वाटपाचे चालेले

कामाचे दस्त, कब्जेपट्टी, फेरफार क्रं. १७५४ वादीने दाखल केला आहे. महसूल खात्यातून झालेला पंचनामा, कब्जेपट्टी प्रतिवादी नाकारतात परंतु तो मुद्दा पुराव्यात सिध्द होईल.

**१९.** वादीने दावा मिळकतीचे ७/१२ उतारे व नमूना ८–अ दाखल केला आहे. ज्यामध्ये गट नं. १२५/अ, १२५/क, १२५/ब यासाठी वादीचे एकमेव नाव मालक भोगवटदार सदरी दिसते. तर गट नं. ४९५ चा ७/१२ पाहता त्यात वादी व प्रतिवादीचे नाव आहे व त्यांच्या नावापुढे स्वतंत्र अशी क्षेत्रफळाची नोंद आहे. या सर्व दस्तावरुन व रे.क.नं.१०९/१९९० च्या निर्णयावरुन वादी, प्रतिवादी मध्ये वाटप होऊन जमिनी स्वतंत्र कब्जे वहिवाटीत असल्याचे सिध्द होते. सबब, दावा मिळकतीवर वादीच्या कथनानुसार त्यांचा ताबा आहे हे प्रथमदर्शनी शाबित होते. सबब, प्रश्नबिंदू क्रं. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते.

## प्रश्नबिंदू क्रं.२ व ३ करीता–

**२०.** वादीचे कथन आहे. दावा मिळकत त्यांच्या ताब्यात आहे व त्यामध्ये वादीचे उभे पीक आहे. प्रतिवादी कथन करतो की, ७/१२ पत्रकी वादीचे नाव असले तरी दावा मिळकत प्रतिवादीच्या कब्जात आहे. त्यातील

उभा ऊस प्रतिवादीचा आहे. हे दर्शविण्याकरिता प्रतिवादीने दस्त यादी नि.क्रं.३७ नुसार कुंभी कासारी साखर कारखान्याच्या ऊस बिल पावत्या दाखल केल्या आहेत त्या झेरॉक्स आहे. (मुळ पावत्या याच दोनही पक्षांच्या चालू असणा–या दुसरा दावा रे.क.नं. क्रं.२२/२०२२ मध्ये दाखल आहेत.) त्या पावत्यांचे अवलोकन करता त्यामध्ये रि.स.नं. शिर्षकाखाली दावा मिळकत १२५/अ/ब/क असे नमूद आहे. परंतु सदरचा दस्त पुरावा कायदा तरतुदीनुसार सिध्द होणे आवश्यक आहे. सदर पावत्या सार्वजनिक दस्त नाहीत.

२१. तसेच सदरचे दस्त सहाकरी साखर कारखान्यातून जारी झाले आहेत. त्याचा उपयोग कब्जा दाखविण्यासाठी करता येणे किंवा त्या पावत्या कब्जे दर्शविण्यासाठी ग्राहय धरणे योग्य ठरणार नाही. सबब नि. ३७ ची कागदपत्रे विचारात घेण्यात येत नाहीत. तसेच प्रतिवादीचा असाही आक्षेप आहे की, महसूल खाती त्यांनी आर.टी.एस. दाखल केले आहे व ते प्रलंबित आहे. परंतू त्याचा अर्थ प्रस्तुत दावा अर्जाला स्थगिती आहे असा घेता येणार नाहीत. सबब सदरचा आक्षेप प्रतिवादीची कोणतीही मदत करत नाही. वादीनी प्रथमदर्शनी कब्जा त्यांचा असल्याचे सिध्द केले आहे. तो संरक्षित न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, न्यायाचा समतोल

वादीच्या बाजूने आहे. म्हणून प्रश्नबिंदू क्रं. २ व ३ वादीच्या हक्कात होकारार्थी नोंदविण्यात येतात.

**प्रश्नबिंदू ४ करीता –**

**२२.** प्रश्नबिंदू क्रं. १ ते ३ चे उत्तर हे वादीच्या हक्कात असल्याने प्रश्नबिंदू क्र. ४ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

२. प्रतिवादी यांनी वादी यांचे दावा मिळकत मधील शांततामय कब्जे वहिवाटीस स्वतः अगर तर्फे इसम यांनी हरकत अगर अडथळा करुन नये अशी तुर्तातुर्त मनाई देण्यात येते.

२. उक्त अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालानंतर होणा–या खर्चाच्या आकारणीवेळी विचारात घेण्यात यावा.

Neha K.Nagargoje

Digitally signed by Neha K.Nagargoje
Date: 2023.03.04 18:20:56 +0530

(नेहा कों.नागरगोजे)

दि. ०२.०३.२०२३. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कळे–खेरीवडे.